# <u>निशाणी क्र.०८ खालील आदेश</u>

(२७.११.२०२५)

जाबदार क्र.२ व ३ यांनी नि.क्र.८ अन्वये जाबदार क्र.१ आणि जाबदार क्र.४ ते ७ यांना त्यांच्या योग्य पत्त्यावर समन्स बजावणी होणेत यावी यासाठी अर्ज दिला आहे.

२. जाबदार क्र.२ व ३ यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतकामी संरक्षण अधिकारी यांनी जाबदार क्र.१ ते ७ या सर्वांचे समन्स जाबदार क्र.२ व ३ यांना जबरदस्तीने स्वीकारणेस भाग पाडले आहे. यातील जाबदार क्र.१ तसेच जाबदार क्र.४ ते ७ हे मौजे वेजेगांव, ता.खानापूर, जि.सांगली येथे वास्तव्यास नाहीत. त्यामुळे त्यांना जाबदार क्र.२ व ३ मार्फत सदरचे समन्स लागू करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्यांचे समन्स कायदेशीररित्या समन्स बजावणी करीता मा. संरक्षण अधिकारी, विटा यांचेकडे जमा करीत आहे. सबब, जाबदार क्र.१ व ४ ते ७ त्यांच्या योग्य पत्त्यावर समन्स बजावणी करणेत यावी अशी विनंती केली आहे.

३. अर्जदाराने जाबदार क्र.२ व ३ यांनी दिलेल्या नि.क्र.०८ च्या अर्जास नि.क्र.१३ अन्वये म्हणणे दिले आहे की, जाबदार क्र.२ व ३ यांचा अर्ज व त्यातील मजकूर अर्जदार यांना मान्य नाहीत. प्रस्तुत अर्जातील जाबदार क्र.१ व जाबदार क्र.५ ही जाबदार क्र. २ व ३ यांची जनक मुले आहेत. जाबदार क्र.६ व ७ या जाबदार क्र.२ व ३ यांच्या मुली आहेत. जाबदार क्र.४ ही जाबदार क्र.२ व ३ यांची सून व जाबदार क्र.५ ची पत्नी आहे. जाबदार क्र.१ ते ७ हे एकाच कुटुंबातील सदस्य आहेत. जाबदार क्र.१ ते ७ यांचे कायमस्वरुपी घर हे मौजे वेजेगांव देवकर मळा येथे आहे. जाबदार क्र.१ व ५ हे व्यवसायानिमित्त, नोकरीनिमित्त जरी परगावी असले तरी ते अधूनमधून गावी येत जात असतात. जाबदार क्र.२ व ३ हे जाबदार क्र.१, ४, ५, ६, ७ यांचेशी फोनवर सतत संपर्कात असतात व आहेत.

४. अर्जदार यांचे पुढे असे कथन आहे की, सदर केसचे काम लांबणीवर पडावे, अर्जदाराला तातडीने न्याय मिळू नये, तिचे मे.कोर्टामध्ये हेलपाटे वाढून

शारिरीक, मानसिक, आर्थीक नुकसान व्हावे या कुटील हेतूने जाबदार क्र.३ यांनी त्यांच्या कुटुंबातील सज्ञान सदस्य म्हणून जाबदार क्र.१,४,५,६ यांचे समन्स संरक्षण अधिकारी यांचेमार्फत स्वखुशीने स्विकारलेले आहे. जाबदार क्र.२, ३ यांनी संरक्षण अधिकारी यांचेविरुध्द खोटे व लबाडीचे आरोप केलेले आहेत. सबब, संरक्षण अधिकारी यांचेकडे चौकशी करण्यात यावी.

५. अर्जदार यांचे पुढे असे कथन आहे की, महिलांचा घरगुती छळापासून संरक्षण हा कायदा क्वॉसी सिव्हील व क्वॉसी क्रिमीनल आहे. समन्स/नोटीसबाबत दिवाणी व फौजदारी कायदयातील तरतुदी या अर्जाला लागू होतात. सदर अर्जाचे समन्स जाबदार क्र.१,४,५,६ यांचेकरीता जाबदार क्र.३ या सज्ञान कुटुंबातील सदस्याने स्विकारले असलेने कायदयातील तरतुदीनुसार जाबदार क्र.१,४,५,६ यांचेवर सदर अर्जाच्या समन्स/नोटीसची कायदेशीररित्या बजावणी झालेली आहे. जाबदार क्र.२ व ३ यांनी नि.क्र.८ ला दिलेल्या अर्जाखाली व्हेरीफिकेशन, अर्जाच्या पुष्टर्थ शपथपत्र दाखल केलेले नाही. अशा स्थितीत जरी जाबदार क्र.२, ३ यांनी जाबदार क्र.१,४,५,६ यांचे समन्स मे.कोर्टात परत दिले असले तरी जाबदार क्र.१,४,५,६ यांच्या कुटुंबातील सज्ञान सदस्याने म्हणजे जाबदार क्र.३ यांनी स्विकारलेले समन्स हे जाबदार क्र.१,४,५,६ या कुटंबातील सदस्यांकरीता स्विकारलेले आहे असा कायदयाने अन्वयार्थ निघतो. सबब, जाबदार क्र.१,४,५,६ यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करणेत याव व जाबदार क्र.२ व ३ यांचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

६. अर्ज वाचला. अर्जदार व जाबदारतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचे प्रकरण अर्जदार यांनी जाबदार क्र.१ ते ७ यांच्याविरुध्द महिलांचा घरगुती जुलूमापासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा २००५ अन्वये दाखल केलेला आहे. जाबदार क्र.२,३ हे अर्जदार यांचे सासू सासरे असून जाबदार क्र.१ हा पती, जाबदार क्र.४ ही जाऊ, जाबदार क्र.५ हे दिर आणि जाबदार क्र.६ व ७ या नणंदा आहेत. जाबदार क्र.१ ते ६ यांचा नि.क्र.१ वरील पत्ता

पाहिला असता रा.वेजेगांव, देवकर मळा, ता.खानापूर असल्याचे दिसून येते. परंतू, जाबदार क्र.२ व ३ यांच्या मते जाबदार क्र. १ ते ७ हे वेजेगाव, जि.सांगली येथे वास्तव्यास नाहीत. परंतू, जाबदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये १ व ४ ते ७ हे कोठे वास्तव्यास आहेत याचा निश्चित पत्ता देखील त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेला नाही. तसेच जाबदार यांच्या मते संरक्षण अधिकारी यांनी जाबदार क्र.२ व ३ यांना जबरदस्तीने समन्स स्विकारण्यास भाग पाडले. सदरील कथनाच्या अनुषंगाने जाबदार यांनी कोणतेही शपथपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ६६ प्रमाणे घरातील प्रौढ व्यक्तीने समन्स स्विकारणे व त्यावर सही करुन ते स्विकारल्यास योग्य ती बजावणी झाली असे समजण्यात येते. अभिलेखावरील बजावलेले समन्स नि.क्र.६ चे अवलोकन केले असता सर्व जाबदार यांना योग्य नोटीस बजावल्याचे दिसून येते व त्यावर अशोक देवकर यांनी स्वत:ची स्वहस्ते तसेच जाबदार क्र.१ व २ आणि जाबदार क्र.१ ते ६ यांच्या वतीने नोटीस स्वीकारल्याचे दिसून येते. यावरुन जाबदार क्र.१ ते ७ यांना योग्य बजावणी झाली असे दिसून येते. जाबदार क्र.७ या दि.०३.११.२०२५ रोजी प्रस्तुत प्रकरणात हजर झालेल्या आहेत. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

सदरचा जाबदार क्र.२ व ३ यांचा नि.क्र.०८ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2025.12.05 18:00:35 +0530

विटा. (श्रीमती व्ही.डी. शिरसे)

दि.२७.११.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, विटा,

ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the Dictation.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G.U.Varude |
| Name of the Court | :- | Smt. V.D. Shirse,<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 27.11.2025 |
| Order signed by P.O. on | :- | 04.12.2025 |
| Order uploaded on | :- | 05.12.2025 |